विशेष लेख क्र :३२७

३ मार्गशिर्ष १९२८ शके (सायं.५.३० वा.)
शुक्रवार, दि. २४ नोव्हेंबर, २००६

## महाराष्ट्रातला तरुण मारणार उंच भरारी

देशाच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल होत आहेत. रस्ते आणि रेल्वे वाहतुकीबरोबरच हवाई वाहतुकीलादेखील प्रवाशांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे अनेक खाजगी कंपन्यानी हवाई वाहतूक क्षेत्राकडे आपला मोर्चा वळवला आहे. त्यांच्यातील स्पर्धेमुळे हा प्रवास स्वस्तही झाला आहे. या कंपन्यांना स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ आणि वैमानिकांची गरज भासत आहे. प्रशिक्षित वैमानिक तयार व्हावेत याकरिता विमान उड्डाण प्रशिक्षणसंस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देऊन त्यांना विमानतळे भाडेपट्टीवर देण्याचे शासनाने ठरविले आहे. हे करत असताना रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करुन देण्याचाही यामागे उद्देश आहे.

मागासभागातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून मराठवाड्यातील लातूर, नांदेड आणि उस्मानाबाद येथील विमानतळांशी संलग्न जागा विमान उड्डाण प्रशिक्षण संस्थांना पाच वर्षांच्या मुदतीसाठी प्रायोगिक तत्त्वावर उपलब्ध करून देण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सध्या ही तिन्ही विमानतळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यात आहेत. या ठिकाणी प्रशिक्षणसंस्था स्थापन करण्यासाठी संबंधितांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. प्रशिक्षण संस्थांना आवश्यक असणारे हॅंगर्स, एक हजार चौरस फूट इतक्या कमाल मर्यादेमध्ये प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम, नाईट लॅंडींग सुविधा इत्यादी गोष्टींची पूर्तता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने करावयाची आहे. यासाठी प्रती विमानतळ कमाल पाच कोटी रूपये खर्च अपेक्षित आहे.

..२

या विमानतळांच्या धावपट्ट्या प्रशिक्षण संस्थांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्रशिक्षण संस्थांच्या वसतिगृहासाठी संबंधीत शहरांतील जमीन प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्रशिक्षण हँगर्स तसेच कार्यालयासाठी आवश्यक जागा लिव्ह अँड लायसन्स तत्त्वावर उपलब्ध करून दिली जाईल. या संबंधीच्या अटी व शर्ती तसेच भाडेपट्टीचा दर ठरविण्याचा अधिकार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला राहणार आहे. या संस्थांमध्ये मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना प्राधान्याने प्रवेश दिला जाणार आहे. या संस्थांकडून प्राप्त झालेल्या उत्पन्नाचा वापर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून विमानतळ तसेच त्याच्याशी संबंधीत मालमत्तेच्या देखभाल, दुरुस्ती आणि विकासासाठी करण्यात येणार आहे. या संस्थांमध्ये प्रशिक्षण घेऊन राज्यातले तरुण आकाशात उंच भरारी मारतील यात शंका नाही. यामुळे रोजगार तर उपलब्ध होणार आहेच. शिवाय शासनाची मालमत्ता वापरात येऊन महसुली उत्पन्नात भर पडणार आहे. या प्रशिक्षण संस्थामुळे प्रशिक्षित वैमानिकांच्या संख्येत भर पडेल आणि हवाई वाहतुकीलादेखील नवे पंख लाभून वाहतूक व्यवस्था अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

**- विशाल ढगे/ आकाश जगधने**

\- - - - -